# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 22.06.2016 (का.प.क्र.-02) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

बुधवार दिनांक 22 जुन 2016 (का.प.क्र .02) रोजी मा.सभापती श्री.मोहन मेघावाले यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.30 वाजता सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.रमेश पवार, अति.आयुक्त, नगरसचिव श्री.दिलीप सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| 1. | स.स.श्री.कमलाकर शामराव जगताप |
| 2. | स.स.श्री.नितीन रमन चित्ते |
| 3. | स.स.श्री.सिताराम इसराम सुरे |
| 4. | स.स.श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| 5. | स.स.श्री.गजानन भानुदास मनगटे |
| 6. | स.स.श्री.रावसाहेब राधाकिसन आमले |
| 7. | स.स.श्री.विकास प्रकाश एडके |
| 8. | स.स.श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| 9. | स.स.श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड |
| 10. | स.स.श्रीमती शेख समिना शेख इलियास |
| 11. | स.स.श्री.अजीम अहेमद रफिक |
| 12. | स.स.श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| 13. | स.स.श्रीमती संगिता सुभाष वाघुले |
| 14. | स.स.श्रीमती मनिषा बाळासाहेब मुंडे |
| 15. | स.स.श्री.सोहेल शकील शेख |

श्री.कैलास गायकवाड :स.सभापती श्री.मोहन मेघावाले यांची ही पहिलीच सभा आहे सभागृहाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात येते व आगामी काळासाठी शुभेच्छा देण्यात येतात.

श्री.रावसाहेब आमले :स.सभापती यांचे अभिनंदन करण्यात येते, तसेच सर्व सदस्यातर्फे सुभे्च्छा देण्यात येतात.

श्री.कैलास गायकवाड :स्थायीसमिती सभेला मा.आयुक्त यांची उपस्थिती नाही. याबाबत खुलासा करण्यात यावा.

मा.आयुक्त :मा.आयुक्त हे मुंबई येथे बैठकीला गेलेले आहेत.

श्री.सिताराम सुरे :मा.स्थायी समिती सभेला माहीती देणे आवश्यक आहे. मा.अतिरिक्त आयुक्त यांना स्थायी समिती सभेकरीता मा.आयुक्तांनी प्राधिकृत केले आहे, प्राधिकृत करण्याचा अधिकार मा.आयुक्तांना आहे का? याबाबतचे पत्र मा.सभापती तसेच आम्हाला दिलेले नाही. असे पत्र काढण्यात आले असेल तर ते दाखविण्यात यावे.

मा.आयुक्त :परंपरेनुसार तसेच तत्कालिन आयुक्त यांनी वेळोवेळी आयोजित होणाऱ्या स्थायी समिती सभेसाठी अतिरिक्त आयुक्त यांना प्राधिकृत करण्यासंबधीचे आदेशच पारित केलेले आहे. तसेच निर्णय घेण्यासाठी सभागृह सक्षम आहे. स्थायी समिती सभेला तसे अधिकार आहेत.

श्री.राजगौरव वानखेडे :सभेत घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी अतिरिक्त आयुक्त हे आयुक्त म्हणुन करू शकतील का? त्यांना अशा प्रकारचे अधिकार आहेत का?

श्रीमती किर्ती शिंदे :सर्व अधिकारी सभेसाठी उपस्थित असणे आवश्यक होते.

श्री.विकास एडके :गेल्या वर्षा जे निर्णय घेतले आहे, त्याची अंमलबजावणी झालेली नाही, शहरातील समस्या सुटत नसतील तर सभा कामकाज चालविणे आवश्यक आहे का?

श्री.कैलास गायकवाड :आयुक्त आजच्य सभेत उपस्थित राहणार नाही याची माहिती मा.सभापती यांना दिली आहे का? तसेच पत्र दाखविण्यात यावे.

श्री.रावसाहेब आमले :प्राधिकृत असल्याबाबत पत्र दाखवण्यात यावे.

श्री.मुकूंद कुलकर्णी :वॉर्ड क्र.1 मधील नाले सफाईची माहिती द्यावी.

श्री.रावसाहेब आमले :आयुक्त नसेल तर याबाबतची माहीती सभापती यांना कळवली आहे का?

श्री.मुकूंद कुलकर्णी :मागच्या वर्षी एकाही स्थायी समिती सभेला मा.आयुक्त उपस्थित नव्हते.

मा.आयुक्त :तत्कालीन आयुक्तांनी अतिरिक्त आयुक्त यांना स्थायी समिती सभेसाठी प्राधिकृत केलेले आहे. तसेच मा.स्थायी समिती सभेला स्वत:चे असे अधिकार आहे.

**विषय क्र. 02 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 481(1) मधील खंड (अ) व्यतीरीक्तचे आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना असलेले अधिकार, कर्तव्ये किंवा कामे अधिनियमाच्या कलम 69 (2) अन्वये मा.स्थायी समितीच्या पुर्वमान्यतेने प्रदान करण्याची तरतुद आहे.

सदरील तरतुदींच्या अधीन राहुन सादर करण्यात येते की, मा.उच्च न्यायालय, मा.सर्वोच्च न्यायालय, मा.लवाद, मंत्रालयीन प्रकरणे अपीलीएंट फोरम इत्यादी मध्ये खालील विभाग प्रमुखांना आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांचेतर्फे खालील नमुद केलेले अधिकार प्रदान करणे योग्य.

| | | |
|---|---|---|
| 1. | **अतिरीक्त आयुक्त** | अधिनिस्त विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत प्रतिज्ञापत्र दाखल करणे, तोंडी निवेदन करणे, दावा दाखल करणे. |
| 2. | **शहर अभियंता** | अधिनिस्त विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत प्रतिज्ञापत्र दाखल करणे, तोंडी निवेदन करणे, दावा दाखल करणे. |
| 3. | **मुख्य लेखा परीक्षक** | अधिनिस्त विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत प्रतिज्ञापत्र दाखल करणे, तोंडी निवेदन करणे, दावा दाखल करणे. |
| 4. | **मुख्य लेखाधिकारी** | अधिनिस्त विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत प्रतिज्ञापत्र दाखल करणे, तोंडी निवेदन करणे, दावा दाखल करणे. |
| 5. | **आरोग्य वैद्यकीय अधिकारी** | अधिनिस्त विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत प्रतिज्ञापत्र दाखल करणे, तोंडी निवेदन करणे, दावा दाखल करणे. |
| 6. | **करमुल्य निर्धारक व संकलक** | अधिनिस्त विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत प्रतिज्ञापत्र दाखल करणे, तोंडी निवेदन करणे, दावा दाखल करणे. |
| 7. | **कार्यकारी अभियंता** | अधिनिस्त विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत प्रतिज्ञापत्र दाखल करणे, तोंडी निवेदन करणे, दावा दाखल करणे. |
| 8. | **उप आयुक्त** | अधिनिस्त विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत प्रतिज्ञापत्र दाखल करणे, तोंडी निवेदन करणे, दावा दाखल करणे. |
| 9. | **बि.ओ.टी. कक्ष प्रमुख** | अधिनिस्त विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत प्रतिज्ञापत्र दाखल करणे, तोंडी निवेदन करणे, दावा दाखल करणे. |
| 10. | **सहा. संचालक नगर रचना** | अधिनिस्त विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत प्रतिज्ञापत्र दाखल करणे, तोंडी निवेदन करणे, दावा दाखल करणे. |
| 11. | **विधी सल्लागार** | अधिनिस्त विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत प्रतिज्ञापत्र |

| | | |
|---|---|---|
| | | दाखल करणे, तोंडी निवेदन करणे, दावा दाखल करणे. |
| 12. | **घनकचरा विभाग प्रमुख** | अधिनिस्त विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत प्रतिज्ञापत्र दाखल करणे, तोंडी निवेदन करणे, दावा दाखल करणे. |
| 13. | **अग्निशमन विभाग प्रमुख** | अधिनिस्त विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत प्रतिज्ञापत्र दाखल करणे, तोंडी निवेदन करणे, दावा दाखल करणे. |
| 14. | **पशू संवर्धन अधिकारी / प्राणी संग्रहालय संचालक** | अधिनिस्त विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत प्रतिज्ञापत्र दाखल करणे, तोंडी निवेदन करणे, दावा दाखल करणे. |
| 15. | **नगर सचिव** | अधिनिस्त विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत प्रतिज्ञापत्र दाखल करणे, तोंडी निवेदन करणे, दावा दाखल करणे. |

मा. जिल्हा न्यायालय, दिवाणी न्यायालय, औद्योगीक न्यायालय, कामगार न्यायालय, वक्फ ट्रीब्युनल, ग्राहकमंच, एस.एल.आर., डी.एल.आर., डी.डी.एल.आर., मा.विभागीय आयुक्त, महसूल प्राधीकरणे इत्यादी ठिकाणी असलेल्या न्यायालयीन प्रकरणांत आयुक्तांचे अधिकार खालील अधिकाऱ्यांना प्रदान करण्यात येतात.

| | | |
|---|---|---|
| 1. | **विधी सल्लागार** | विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा दाखल करणे, साक्ष देणे. |
| 2. | **मालमत्ता अधिकारी** | विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा दाखल करणे, साक्ष देणे. |
| 3. | **पदनिर्देशित अधिकारी** | विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा दाखल करणे, साक्ष देणे. |
| 4. | **वॉर्ड / प्रभाग अधिकारी** | विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा दाखल करणे, साक्ष देणे. |
| 5. | **उपअभियंता** | विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा दाखल करणे, साक्ष देणे. |
| 6. | **उद्यान अधिक्षक** | विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा दाखल करणे, साक्ष देणे. |
| 7. | **आस्थापना अधिकारी** | विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा दाखल करणे, साक्ष देणे. |
| 8. | **शिक्षणाधिकारी** | विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा दाखल करणे, साक्ष देणे. |
| 9. | **प्रकल्प अधिकारी / संचालक** | विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा दाखल करणे, साक्ष देणे. |
| 10. | **अग्निशमन विभाग प्रमुख** | विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा दाखल करणे, साक्ष देणे. |

| | | |
|---|---|---|
| 11. | **पशू संवर्धन अधिकारी / प्राणी संग्रहालय संचालक** | विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा दाखल करणे, साक्ष देणे. |
| 12. | **उद्यान अधिक्षक व वृक्ष प्राधिकरण विभाग** | विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा दाखल करणे, साक्ष देणे. |
| 13. | **कामगार अधिकारी** | विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा दाखल करणे, साक्ष देणे. |

यापुर्वी न्यायालयीन प्रकरणात जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे यासंबंधी आयुक्त यांचेकडून संबंधीत विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात आलेले अधिकार रद्दबातल करण्यास्तव व उक्त ठराव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

श्री.सिताराम सुरे :विषय क्रमंक 02 मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती : विषय क्र.2 दुरूस्तीसह मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 481(1) मधील खंड (अ) व्यतीरीक्तचे आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना असलेले अधिकार, कर्तव्ये किंवा कामे अधिनियमाच्या कलम 69(2) अन्वये मा.उच्च न्यायालय, मा.सर्वोच्च न्यायालय,मा.लवाद,मंत्रालयीन प्रकरणे अपीलीएंट फोरम,मा.जिल्हा न्यायालय, दिवाणी न्यायालय, औद्योगीक न्यायालय, कामगार न्यायालय,वक्फ ट्रिब्युनल, ग्राहक मंच, एस.एल.आर. डी.एल.आर. डी.डी.एल.आर., मा.विभागीय आयुक्त, महसूल प्राधीकरणे इत्यादी ठिकाणी असलेल्या न्यायालयीन प्रकरणात आयुक्तांचे अधिकार खालीलप्रमाणे विभाग प्रमुख / अधिकारी यांना दुरूस्तीसह प्रदान करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | **अतिरीक्त आयुक्त** | अधिनिस्त विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत प्रतिज्ञापत्र दाखल करणे, तोंडी निवेदन करणे, दावा दाखल करणे. |
| 2. | **शहर अभियंता** | अधिनिस्त विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत प्रतिज्ञापत्र दाखल करणे, तोंडी निवेदन करणे, दावा दाखल करणे. |
| 3. | **मुख्य लेखा परीक्षक** | अधिनिस्त विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत प्रतिज्ञापत्र दाखल करणे, तोंडी निवेदन करणे, दावा दाखल करणे. |
| 4. | **मुख्य लेखाधिकारी** | अधिनिस्त विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत प्रतिज्ञापत्र दाखल करणे, तोंडी निवेदन करणे, दावा दाखल करणे. |
| 5. | **आरोग्य वैद्यकीय अधिकारी** | अधिनिस्त विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत प्रतिज्ञापत्र दाखल करणे, तोंडी निवेदन करणे, दावा दाखल करणे. |
| 6. | **करमुल्य निर्धारक व संकलक** | अधिनिस्त विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत प्रतिज्ञापत्र दाखल करणे, तोंडी निवेदन करणे, दावा दाखल करणे. |
| 7. | **कार्यकारी अभियंता** | अधिनिस्त विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत प्रतिज्ञापत्र दाखल करणे, तोंडी निवेदन करणे, दावा दाखल करणे. |
| 8. | **उप आयुक्त** | अधिनिस्त विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत प्रतिज्ञापत्र दाखल करणे, तोंडी निवेदन करणे, दावा दाखल करणे. |
| 9. | **बि.ओ.टी. कक्ष प्रमुख** | अधिनिस्त विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत प्रतिज्ञापत्र दाखल करणे, तोंडी निवेदन करणे, दावा दाखल करणे. |
| 10. | **सहा. संचालक नगर रचना** | अधिनिस्त विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत प्रतिज्ञापत्र |

| | | |
|---|---|---|
| | | दाखल करणे, तोंडी निवेदन करणे, दावा दाखल करणे. |
| 11. | **विधी सल्लागार** | अधिनिस्त विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत प्रतिज्ञापत्र दाखल करणे, तोंडी निवेदन करणे, दावा दाखल करणे, मनपा तथा आयुक्त यांचे तर्फे वकीलपत्र दाखल करणे. |
| 12. | **घनकचरा विभाग प्रमुख** | अधिनिस्त विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत प्रतिज्ञापत्र दाखल करणे, तोंडी निवेदन करणे, दावा दाखल करणे. |
| 13. | **अग्निशमन विभाग प्रमुख** | अधिनिस्त विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत प्रतिज्ञापत्र दाखल करणे, तोंडी निवेदन करणे, दावा दाखल करणे. |
| 14. | **पशू संवर्धन अधिकारी / प्राणी संग्राहलय संचालक** | अधिनिस्त विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत प्रतिज्ञापत्र दाखल करणे, तोंडी निवेदन करणे, दावा दाखल करणे. |
| 15. | **नगर सचिव** | अधिनिस्त विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत प्रतिज्ञापत्र दाखल करणे, तोंडी निवेदन करणे, दावा दाखल करणे. |
| 16. | **निवडणुक विभाग प्रमुख** | अधिनिस्त विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत प्रतिज्ञापत्र दाखल करणे, तोंडी निवेदन करणे, दावा दाखल करणे. |

मा.जिल्हा न्यायालय, दिवाणी न्यायालय, औद्योगीक न्यायालय, कामगार न्यायालय, वक्फ ट्रीब्युनल, ग्राहकमंच, एस.एल.आर., डी.एल.आर., डी.डी.एल.आर., मा.विभागीय आयुक्त, महसूल प्राधीकरणे इत्यादी ठिकाणी असलेल्या न्यायालयीन प्रकरणांत आयुक्तांचे अधिकार खालील अधिकाऱ्यांना प्रदान करण्यात येतात.

| | | |
|---|---|---|
| 1. | **मालमत्ता अधिकारी** | विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा दाखल करणे, साक्ष देणे. |
| 2. | **पदनिर्देशित अधिकारी** | विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा दाखल करणे, साक्ष देणे. |
| 3. | **वॉर्ड / प्रभाग अधिकारी** | विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा दाखल करणे, साक्ष देणे. |
| 4. | **उपअभियंता** | विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा दाखल करणे, साक्ष देणे. |
| 5. | **आस्थापना अधिकारी** | विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा दाखल करणे, साक्ष देणे. |
| 6. | **शिक्षणाधिकारी** | विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा दाखल करणे, साक्ष देणे. |
| 7. | **प्रकल्प अधिकारी / संचालक** | विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा दाखल करणे, साक्ष देणे. |
| 8. | **उद्यान अधिक्षक व वृक्ष प्राधिकरण विभाग** | विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा दाखल करणे, साक्ष देणे. |
| 9. | **कामगार अधिकारी** | विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा दाखल करणे, साक्ष देणे. |
| 10. | **लेखा अधिकारी** | विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा दाखल करणे, साक्ष देणे. |
| 11. | **संगणक कक्ष प्रमुख** | विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा दाखल करणे, साक्ष देणे. |
| 12. | **स्थानिक संस्था कर (LBT) प्रमुख/अधिकारी** | विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणांत जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा दाखल करणे, साक्ष देणे. |

यापुर्वी न्यायालयीन प्रकरणात जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे यासंबंधी आयुक्त यांचेकडून संबंधीत विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात आलेले अधिकार रद्दबातल करण्यास तसेच समांतर जलवाहिनीच्या मा.न्यायालयातील प्रकरणांत केवळ आयुक्त यांनी शपथपत्र दाखल करण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

श्री.राजगौरव वानखेडे :विधी सल्लागार यांनी खुलासा करावा.

विधी सल्लागार :एल.सी.केलेले आहे. प्रलंबित प्रकरणांचा एकत्रितरित्या आढावा घेवुन कार्यवाही करण्यात येत आहे.

श्री.मुकूंद कुलकर्णी :एलईडी प्रकरणाबाबत खुलासा करण्यात यावा.

विधी सल्लागार :उन्हाळयाच्या सुट्टया आहेत. नोटीस सर्वांना प्राप्त झाल्यावर रजिष्ट्रार तारिख देईल.

मा.सभापती :सर्व माहिती घेवुन कळविण्यात यावे.

श्री.मुकूंद कुलकर्णी :नाले सफाईचे टेंडर दिलेले नाही. किती लेबर किती वार्डाला दिलेले आहे. खुलासा करण्यात यावा.

वार्ड अभियंता : वार्डामध्ये एकुण 11 नाले आहेत 9 नाल्यांची सफाई झालेली आहे. 02 नाल्यांचे काम बाकी आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :मनपा मुख्यालयाच्या जवळील नाला अद्यापपर्यंत साफ झालेला नाही.

मा.सभापती :उर्वरित नाल्यांची सफाई केव्हा व किती दिवसात करणार याचा खुलासा करण्यात यावा.

वार्ड अभियंता :चार ते पाच दिवसात साफसफाईचे कामे करण्यात येईल.

मा.सभापती :वार्डातील नाल्यावरील जेही अतिक्रमण असेल किंवा शहरातील बऱ्याच नाल्यात/नाल्यावर अतिक्रमण झालेले आहे ते त्वरील काढण्याबाबत कार्यवाही करावी. नाले सफाईबाबत वार्ड वाईज चर्चा करण्यात यावी. महानगरपालिकेकडे सर्व यंत्रणा कार्यरत आहे. मग नाला सफाई करण्यात काय अडचण आहे. आजच्या स्थितीत काय उपाययोजना करता येतील.

श्री.नितीन चित्ते :नाला सफाईला आपण किती दिवसापूर्वी सुरूवात केली. तेथील कचरा उचलण्याबाबत टेंडर झालेले आहे का?

शहर अभियंता :67 कि.मी.चे नाले आहेत (मोठे नाले) नाले खोलवर सफाई करावयाची झाल्यास करोडो रूपयांचा खर्च लागणार आहे. नागरीक कचरा मलबा नाल्यात आणुन टाकतात. सध्या नाला सफाईचे कामे चालु आहे नाल्याच्या वर असलेला कचऱ्याचा थर उपलब्ध यंत्रणेच्या माध्यमातुन काढला जातो. या सर्व कामाचे व्हिडीओ शुटींग केले जाते पुर्वी असलेल्या नाल्याची स्थिती आणि सफाई नंतरची स्थितीचे रेकॉर्डीग केले जाते. आपल्या कडे रेकॉर्डीग उपलब्ध आहे. फोटोग्राफस् काढलेले आहे. खालील प्रमाणे नाल्यांचे कामाची स्थिती आहे.

प्रभाग क्रमांक 1 , एकुण 11 नाले, 9 नाल्यांचे काम पुर्ण झालेले आहे, 02 बाकी, प्रभाग क्रमांक 2 एकुण 05 नाले, 2 पुर्ण 3 बाकी, प्रभाग क्रमांक 4 एकुण 7 नाले 6 पूर्ण 1 बाकी, प्रभाग क्रमांक 7 एकुण 21 नाले 9 पुर्ण. नाला सफाई करण्याची प्रक्रीया हि नियमित पध्दत आहे. सफाई केल्यावर काही दिवसात पुन्हा नागरीक नाल्यामध्ये घाण आणुन टाकतात पुन्हा कचरा साठतो. (नाल्यांबाबर शहर अभियंता यांनी वॉर्ड वाईझ सविस्तर नाले सफाई बाबत सभागृहास माहिती दिली.)

श्री.विकास एडके :माझा वार्डातील नाल्यावर साफसफाईसाठी लाखो रूपये खर्च करण्यात येतात परंतु नाल्याची स्थिती तशीच राहते.

श्री.राजगौरव वानखेडे :याबाबतचा डिपीआर आपण तयार केला आहे का? प्रशासन कायमस्वरूपी काय उपाय योजना करणार आहे.

शहर अभियंता :बरेच नाले हे नाले राहिलेले नाही ते नाल्या झालेल्या आहेत, नाले संकुचित झाले आहेत. नाल्यांमध्ये आरसीसी भिंती उभ्या आहेत. नाले सफाईला अडचणी येतात.

श्री.राजगौरव वानखेडे :बऱ्याच नाल्यांमधुन ड्रेनेजचे पाणी वाहत आहे, नाल्यांमधुन ड्रेनेज लाईन टाकण्यात येते. डीपीआर तयार करणे आवश्यक आहे.

श्री.कैलास गायकवाड :आठ दिवसात राहीलेले नाला सफाईचे काम व्हायला पाहिजे, अशी मी विनंती करतो.

श्री.विकास एडके :सर्व नाल्यांची प्रत्यक्ष जाऊन पाहणी करू, 11 नाल्यांपैकी फक्त 03 नाल्यांचे कामे झाले असतील, सभागृहामध्ये चुकीची माहिती देण्यात येत आहे.

श्री.नितीन चित्ते :अधिकाऱ्यांमध्ये संवाद नसल्याकारणाने समस्या निर्माण होत आहे. नाल्यांची सफाई अगोदर सुरू केली. नंतर टेंडर काढले, नाल्यांची विडथ्, डेप्थ् किती याचा अभ्यास होणे आवश्यक आहे. नाल्यामध्ये आरसीसीचे पक्के बांधकाम झालेले आहे.

शहर अभियंता :डीपीआर तयार करण्याचे काम बाकी आहे.

श्री.नितीन चित्ते : एका ठिकाणी व्हिजीटला गेलो असता नाल्यामध्ये आरसीसीचे पक्के बांधकाम झालेले दिसुन आले. सकाळी नाल्याची साफसफाई केली जाते, संध्याकाळी पुन्हा त्या ठिकाणी कचरा पडलेला असतो. हे कुठेतरी थांबणे आवश्यक आहे. नाल्यामध्ये सर्रास अतिक्रमण केलेले आहे, ते निष्कासीत करणे आवश्यक आहे. नाल्यांची साफसफाई कधी सकुरू केली याचे टेंडर कधी केले. याची माहीती देण्यात यावी. साफसफाई सुरू केल्यानंतर पोकलेन, जेसीबीचे टेंडर काढले, काम करतांना मनपाचा कुठेतरी फायदा झाला पाहिजे. नाल्याची विडथ् आणि डेप्थची माहिती घेण्यात यावी. ज्या ज्या ठिकाणीअतिक्रमण असेल ते काढण्यात यावे.

श्री.राजगौरव वानखेडे :अतिक्रमण कोणकोणत्या नाल्यावर झाले आहे त्याची माहिती घेऊन नाल्यांवरील अतिक्रमण निष्काषित करण्यासाठी सभापतींनी प्रशासनाला आदेशित करण्यात यावे.

मा.सभापती :स.सदस्य पोटतिडकीने या विषयाबद्दल चर्चा केलेली आहे. हा जिव्हाळयाचा प्रश्न आहे, मी स्वतः नाल्याची पाहणी केलेली आहे. नाल्याच्या मधोमध आरसीसीचे बांधकाम झालेले आहे. येत्या आठ दिवसात नाल्यांची साफसफाई करण्यात यावी. पुढील सभेमध्ये नाल्यावर किती अतिक्रमण झालेले आहे याबाबतची माहिती देण्यात यावी. वार्ड निहाय नाल्यावरील अतिक्रमणाची माहिती तसेच याबाबतीत कोणकोणत्या उपाययोजना करणार आहे याबाबतची सविस्तर माहिती सादर करण्यात यावी.

श्री.राजगौरव वानखेडे :शहरात डेंग्युचा आजाराने डोके वर काढलेले आहे अनेक रूग्णालयात नागरीकांची गर्दी वाढत आहे नागरीक आजारी पडत आहे. परंतु महानगरपालिकेकडुन डास निर्मुलाबाबत कुठलिच कार्यवाही केली जात नाही. शहरात कुठेही फवारणी दिसुन येत नाही. आरोग्य विभाग या बाबत उदासिन आहे.

मा.सभापती :संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी:शहरातील फवारणीचे पुर्ण काम करायचे असेल तर साधारणतः दोन कोटीचा खर्च अपेक्षित आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :आरोग्य विभागाकडुन यासंबधी कोणती तयारी केलेली आहे याचा खुलासा करावा. सभागृहाची दिशाभुल करू नये.

आरोगय वैद्यकीय अधिकारी :फवारणीकरीता मनुष्यबळ कमी पडत आहे. आरोग्य विभागामार्फत डेंग्यु सदृश ठिकाणी फवारणी करण्याचे काम करण्यात येत आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :नागरीकांच्या जीवनाशी खेळत आहे.

श्री.कैलास गायकवाड :शहरात कुठेही फवारणीचे काम चालु नाही. अबेट, फॉगींगची फवारणी केली जात नाही. शहरात पाहिजे त्या प्रमाणान कार्यवाही दिसुन येत नाही.

मा.सभापती :पावसाळा सुरू झालेला आहे. साथरोग शहरात पसरू नये, म्हणुन आरोग्य विभागातर्फे तयारी कशा पध्दतीने केलेली आहे. माहिती देण्यात यावी.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी :ॲबेट ट्रिटमेंट 10 दिवसांनी करणे अपेक्षित आहे. तसेच फाँगीगची फवारणी ज्या ठिकाणी संशयीत रूग्ण आढळुन येईल त्या भागात, आजुबाजूला फवारणी करणे अपेक्षित आहे, किंवा फवारणी केली जाते.

श्री.नितीन चित्ते :12 रूग्ण शहरात डेंग्युचे आढळलेले आहे. मॅनपावर बाबत नियोजन करणे आवश्यक आहे, मॅनपॉवरची कमतरता आहे. सिस्टीम लावण्याची गरज आहे. शहरात डासांचा प्रादुर्भाव वाढलेला आहे, पावसाळयाचे दिवस असल्याने साथरोग पसरू नये, म्हणुन रोज फवारणी झाली पाहिजे.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी :रोज शहरात फवारणीसाठी 350 कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे.

मा.आयुक्त :आरोग्य विभागाला आदेशित करण्यात येते की, त्यांनी शहरात फवारणीचे काम तात्काळ सुरू करण्यात यावे. नागरीकांच्या जिवाशी खेळु नये, एक ॲक्शन प्लॅन तयार करून कार्यवाही करण्यात यावी. फवारणीचे काम बचत गटामार्फत करण्यात यावे.

श्री.जगताप :अंबीका नगर येथील आरोग्य केंद्र हे नाल्यावर बांधण्यात आलेले आहे. ज्या ठिकाणी नागरीक ट्रिटमेंट घे्ण्याकरीता येतात त्या ठिकाणी नाल्यामध्ये अस्वच्छता आहे. आरोग्य केंद्र अशा ठिकाणी असल्याकारणाने सर्वात जास्त साथरोगाचा धोका त्या ठिकाणी आहे.

मा.सभापती :याबाबत कोणत्या उपाययोजना करता येईल.

श्रीमती संगीता वाघुले : माझ्या वार्डात आरोग्य केंद्रच नाही. वार्ड क्रमांक 37 मिसारवाडी येथे त्वरीत एखादे आरोग्य केंद्र सुरू करण्यात यावे.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी :जागा उपलब्ध असल्यास येथे आरोग्य केंद्र सुरू करत येईल.

श्री.रावसाहेब आमले :मनपाच्या शाळेत पाण्याच्या टाक्या नाहीत, मुलभूत सोई सुविधा उपलबध नाही. माझ्या वार्डातील शाळेतुन 92 टक्के घेणारे विद्यार्थी आहे. परंतु त्यांना कुठल्याच सोईसुविधा उपलब्ध नाही. खाजगी शाळांमध्ये विदद्यार्थी संख्या वाढविण्याकरिता वेगवेगळे आमिष दाखवले जातात. महानगरपालिकेला अजून शिक्षण अधिकारी मिळालेला नाही, त्याची व्यवस्था तात्काळ करण्यात यावी.

श्रीमती शे्ख शमीना :महानगरपालिकेच्या शाळेच्या विद्यार्थी संख्या घटण्याचे मुख्य कारण म्हणजे अपुऱ्या सोयी सुविधांचा अभाव हा आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :कायमस्वरूपी शिक्षकांची व्यवस्था करणे आवश्यक आहे. याबाबत प्रशासनाने तातडीने ही समस्या सोडवली पाहिजे.

सौ.किर्ती शिंदे :माझ्या वार्डात सेमी इंग्रजी शाळा चालु करण्यात यावी.

श्री.कैलास गायकवाड :एकुण माध्यमिक शाळा किती, शिक्षक किती माहिती देण्यात यावी. महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या कमी होत आहे. ज्या ठिकाणी विद्यार्थी संख्या जास्त आहे त्या ठिकाणी विद्यार्थ्यांना शिकविण्याकरीता शिक्षकच नाही, ही समस्या उच्च माध्यमिक वर्गांना जास्त प्रमाणात भेडसावत आहे. याकडे प्रशासनाचे पुर्णतः दुर्लक्ष होत आहे. बीएड शिक्षक नाही त्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर परिणाम होतो.

उपआयुक्त (प्र) :महानगरपालिकेत मा.आयुक्त यांचे आदेशान्वये 70 अधिकाऱ्यांची शाळा सुरू होण्याच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देवुन स्वागत करण्यासाठी आदेश निर्गमित झाले होते, यामध्ये मनपाच्या शाळेत विद्यार्थी संख्या वाढण्यासाठी प्रोत्साहन देणे तसेच इतर सुविधांबाबत आढावा घेण्यासाठी 70 अधिकाऱ्यांचे आदेश काढण्यात आले होते, प्रशासनाच्या वतीने मनपाच्या शाळेत विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न चालु आहेत. पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना मोफत गणवेशाचे वाटप करण्यात आले. सीएसआर फंडींग एअरपोर्ट ॲथॉरेटी यांना महानगरपालिका शाळेतील टॉयलेट दुरूस्ती बाबत विनंती केलेली आहे. सेमी इंग्रजी शाळा करण्याचा प्रयत्न सुरू केलेला आहे. शाळा बाहय तसेच शाळा इच्छुक विद्यार्थी शाळा प्रवेश विद्यार्थी यासाठी आज दूपारी 3.00 वाजती मी सर्व मुख्यध्यापकांची बैठक डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर येथे बोलावली आहे. एकुण माध्यमिक शाळा 12 आहेत. तसेच तासिका तत्वावर शिक्षकांची नेमणुक केलेली आहे. बीएड शिक्षकांची संख्या कमी आहे. परंतु याबाबतचे नियोजन करून काम करण्यात येत आहे.

श्री.कैलास गायकवाड :याबाबत मा.आयुक्त यांना बीएड शिक्षकांच्या आवश्यकतेकरीता तात्काळ अहवाल पाठविण्यात यावा.

श्री.रावसाहेब आमले :माझ्या वार्डातील शाळा ही उत्तम असुन विद्यार्थी संख्याही चांगली आहे परंतु विद्यार्थ्यांना बसण्याकरीता वर्ग खोल्या अपुऱ्या आहे. प्रशासनाने तात्काळ व्यवस्था करावी दुरूस्ती अभावी अनेक अडचणी येत आहे. सदरील प्रश्न वारंवार मी प्रशासनाच्या लक्षाल आणुन दिलेला आहे परंतु त्याची कुणीही दखल घेत नाही. बजेटचा मुद्दा समोर करून प्रश्न टाळला जातो.

मा.सभापती :मिटमिटाच्या शाळेसह सर्व शाळेच्या दुरूस्तीसाठी बजेटमध्ये तरतुद करण्यात यावी.

श्री.राजगौरव वानखेडे :शासनाकडे महानगरपालिकेचे 83 कोटी अनुदान थकलेले आहे.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा

उपआयुक्त (प्र) :1982 ते 2003 पर्यंतची ही थकबाकी आहे सन 2011-12 व वेळोवेळी शासनाला यासंबधी पाठपुरावा केलेला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या फॉरमॅटनुसार माहिती भरून दिलेली आहे. 83 कोटी भाटेपोटी मिळावे यासाठी जोमाने प्रयत्न करीत आहे. लवकरात लवकर सदरील पैसे मनपा फंडात कसे जमा होईल यासाठी प्रयत्न चालु आहे.

मुख्यलेखाधिकारी :सन 2016-17 साठी शाळा दुरूस्तीसाठी 10 लाखाची तरतुद ठेवण्यात आलेली आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :77 शाळा आहेत, 10 लाखामध्ये काय होणार? कमीत कमी 2 कोटी रूपये तरतुद ठेवायला पाहिजे.

श्री.कैलास गायकवाड :संबधीत कार्यकारी अभियंता इमारती व उद्यान यांची ही जबाबदारी आहे.

मा.सभापती :शाळेसंबधी सर्वच स.सदस्यांनी पोटतिडकीने प्रश्न विचारलेले आहे. विद्यार्थी संख्या वाढीसाठी तसेच शाळा दुरूस्ती संबधीची कार्यवाही यापुर्वीच होणे आवश्यक होते, शासनाकडुन लवकरात लवकर अनुदान कसे मिळेल यासाठीचे प्रयत्न प्रशासनाने करावे. सीएसआर मधुन निधी मिळण्याकरीता प्रयत्न करावे. येणाऱ्या बजेटमध्ये शाळेसाठी/ दुरूस्तीसाठी जास्तीत जास्त तरतुद ठेवण्यात यावी. तसेच येणाऱ्या सभेमध्ये सर्व अधिकारी यांनी सर्व माहितीसह तसेच सर्वच अधिकारी उपस्थित राहील याची दक्षता घ्यावी.

मा.आयुक्त :आगामी स्थायी समिती सभेला सर्वच अधिकारी सर्व माहितीनिशी उपस्थित राहतील याबाबत मा.आयुक्तांशी तात्काळ चर्चा करण्यात येईल.

मा.सभापती :शिक्षणाधिकारी त्वरीत देण्याबाबत कार्यवाही व्हावी.

याच बरोबर मा.महापौर यांनी राष्ट्रगिताने सभा संपन्न झाल्याचे घोषित केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद